(इंग्रजीमध्ये टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठीत अनुवाद)

**[२०१८] ३ एस. सी. आर. १००८**

**पान क्रमांक १००८ ते १०१०.**

**महाराष्ट्र राज्य आणि इतर**

**विरुद्ध**

**डॉ. शर्विल थत्ते आणि इतर**

**(दिवाणी अपील क्रमांक ३६१२/२०१८)**

**०५ एप्रिल, २०१८.**

**[न्यायमूर्ती अरुण मिश्रा आणि न्यायमूर्ती उदय उमेश लळीत ]**

शिक्षण/शैक्षणिक संस्था – वैद्यकीय प्रवेश – पात्रता निकष – अधिवास स्थिती – महाराष्ट्र राज्यातील विनाअनुदानित खाजगी शैक्षणिक संस्थांमध्ये पदव्युत्तर वैद्यकीय/दंत अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी महाराष्ट्र राज्याने जारी केलेली अधिसूचना – अधिसूचनेत विहित केलेल्या पात्रता निकषांमधील अट क्रमांक (२) मध्ये असे म्हटले आहे की उमेदवार महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असला पाहिजे – प्रतिवादी क्रमांक १ ते ९ यांनी त्याला आव्हान देणारी रिट याचिका दाखल केली, ती मंजूर करण्यात आली – त्यावर दाखल अपिलामध्ये असा निर्णय देण्यात आला : **डॉ. कृती लखिना विरुद्ध**

**कर्नाटक राज्य** या प्रकरणामध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ०४.०४.२०१८ च्या न्यायनिर्णयाद्वारे, शासकीय महाविद्यालयांमध्ये पदव्युत्तर वैद्यकीय/दंत अभ्यासक्रमांसाठीचा प्रवेश आणि खाजगी वैद्यकीय/दंत महाविद्यालयांमधील शासकीय कोट्यातील जागा या संदर्भात कर्नाटक राज्याने जारी केलेल्या माहिती पत्रकामध्ये नमूद केलेल्या अशाच समान प्रकारच्या अटीला दिलेले आव्हान मान्य करण्यात आले आहे - उच्च न्यायालयाने घेतलेला दृष्टिकोन मान्य आहे आणि त्यात हस्तक्षेप करण्याचे कोणतेही कारण नाही.

**अपील फेटाळून लावताना, न्यायालयाने पुढील निर्णय दिला:**

**निर्णय : १. डॉ. कृती लखीना विरुद्ध कर्नाटक राज्य (रिट याचिका (दिवाणी) क्र. २०४/२०१८) या प्रकरणामध्ये दिनांक ०४.०४.२०१८ रोजीच्या या न्यायालयाच्या न्यायनिर्णय आणि आदेशाद्वारे, शासकीय महाविद्यालयांमध्ये पदव्युत्तर वैद्यकीय/दंत अभ्यासक्रमांसाठीचा प्रवेश आणि खाजगी वैद्यकीय /दंत महाविद्यालयांमधील शासकीय कोट्यातील जागा या संदर्भात कर्नाटक राज्याने जारी केलेल्या माहिती पत्रकामध्ये नमूद केलेल्या अशाच प्रकारच्या समान अटीला दिलेले आव्हान मान्य करण्यात आले होते. [परिच्छेद ६][१०१०- क]**

डॉ. कृती लखीना विरुद्ध कर्नाटक राज्य **[रिट याचिका (दिवाणी) क्र. २०४/२०१८ ह्या प्रकरणामध्ये सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ०४.०४.२०१८ रोजी पारित**

**केलेला निर्णय**]; डॉ. प्रदीप जैन आणि इतर विरुद्ध भारताचे संघराज्य आणि इतर **(१९८४) ३ एस. सी. सी. ६५४: [१९८४] ३ एस. सी. आर. ९४२**; विशाल गोयल आणि इतर विरुद्ध कर्नाटक राज्य आणि इतर **(२०१४) ११ एस. सी. सी. ४५६ - या प्रकरणातील न्यायनिर्णयांचा आधार घेतला .**

**<u>केस लॉ संदर्भ</u>**

**[१९८४] ३ एस. सी. आर. ९४२ मधील परिच्छेद ०५ चा आधार घेतला.**

**(२०१४) ११ एस. सी. सी. ४५६ मधील परिच्छेद ०५ चा आधार घेतला.**

**दिवाणी अपिलीय अधिकारिता : दिवाणी अपील क्रमांक ३६१२/२०१८.**

मुंबई येथील उच्च न्यायालयाच्या अधिकारितेमध्ये रिट याचिका क्रमांक १८१४/२०१८ मधील दिनांक २२.०२.२०१८ रोजीच्या न्यायनिर्णय आणि आदेशामधून उद्भवलेले अपील.

अपीलकर्त्यांच्या वतीने :- तुषार मेहता, वरिष्ठ वकील आणि निशांत रमाकांतराव कटनेश्वरकर व श्रीमती दीपा एम. कुलकर्णी, वकील.

उत्तरवादीच्या वतीने :- श्याम दिवाण, वरिष्ठ वकील; श्रीमती पूजा थोरात, सत्यजित ए. देसाई, श्रीमती अनघा एस. देसाई, सुधांशू एस. चौधरी, श्रीमती सुरभी गुलेरिया आणि शकुल आर. घाटोळे, वकील.

**या न्यायालयाचा निकाल न्यायमूर्ती उदय उमेश लळीत यांच्याद्वारे देण्यात आला.**

१. अनुमती मंजूर.

२. विशेष अनुमतीद्वारे केलेले हे अपील, रिट याचिका क्रमांक १८१४/२०१८ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक २२.०२.२०१८ रोजी दिलेल्या न्यायनिर्णय आणि आदेशाला आव्हान देण्यासाठी केले आहे.

३. महाराष्ट्र राज्यातील विनाअनुदानित खाजगी शैक्षणिक संस्थांमध्ये पदव्युत्तर वैद्यकीय/दंत अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेण्यासंबंधात महाराष्ट्र राज्याने दिनांक ३०.०१.२०१८ रोजी जारी केलेल्या अधिसूचनेत विहित केलेल्या पात्रता निकषांमधील अट क्रमांक (२) ला आव्हान देणारी वरील रिट याचिका उत्तरवादी क्रमांक १ ते ९ यांनी दाखल केली होती. सदर अट खालीलप्रमाणे आहे:-

"(दोन) उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असावा."

४. राज्य सरकारने २०१७-१८ ह्या शैक्षणिक वर्षासाठी अशाच प्रकारची अट लादली होती आणि सदर अटीविरोधात दाखल रिट याचिका क्रमांक ५२८३/२०१७ मध्ये उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने दिनांक ३०.०४.२०१७ रोजीच्या त्यांच्या आदेशानुसार सदर अटीला स्थगिती दिली होती. सदर आदेशाला या न्यायालयात विशेष अनुमती याचिका (दिवाणी) क्रमांक १४४४७/२०१७ दाखल करून आव्हान देण्यात आले होते.

तथापि, राज्याने सदर याचिका चालविली नाही आणि परिणामी, या न्यायालयाने सदर याचिका दिनांक ०५.०५.२०१७ रोजीच्या आदेशाद्वारे निकाली काढली.

५. उच्च न्यायालयाने वरील अपिलामध्ये दिलेल्या त्यांच्या न्यायनिर्णयामध्ये **डॉ. प्रदीप जैन आणि इतर विरुद्ध भारताचे संघराज्य आणि इतर**[1] तसेच **विशाल गोयल आणि इतर विरुद्ध कर्नाटक राज्य आणि इतर** [2] या प्रकरणांमध्ये ह्या नायायालयाने दिलेल्या निर्णयांचा मुख्यत्वेकरून आधार घेऊन वरील अटीला दिलेले आव्हान मान्य केले. याचिका मंजूर करताना आणि सदर अट रद्द करताना, उच्च न्यायालयाने पुढील निरीक्षण नोंदवले:-

> "८] अशा प्रकारे असे दिसून येते की, कायद्यामध्ये एक सुस्थापित तत्व असे आहे की, जरी संस्थात्मक पसंतीच्या आधारावर आरक्षण देणे अनुज्ञेय असले तरी, जी अट स्नातक पदवी धारण करीत असलेल्या उमेदवाराला त्या राज्याचा अधिवासी असणे देखील आवश्यक करते, ती अट अनुज्ञेय राहणार नाही."

६. रिट याचिका (दिवाणी) क्रमांक २०४/२०१८ मधील आमच्या दिनांक

---

1 (१९८४) ३ एस. सी. सी. ६५४.

2 (२०१४) ११ एस. सी. सी. ४५६.

०४.०४.२०१८ रोजीच्या न्यायनिर्णय आणि आदेशाद्वारे, आम्ही कर्नाटक राज्याने शासकीय महाविद्यालयांमध्ये पदव्युत्तर वैद्यकीय/दंत अभ्यासक्रमांसाठीचा प्रवेश आणि खाजगी वैद्यकीय/दंत महाविद्यालयांमधील शासकीय कोट्यातील जागा या संदर्भात जारी केलेल्या माहिती पत्रकामध्ये समाविष्ट केलेल्या समान अटीला दिलेले आव्हान मान्य केले आहे. आम्ही प्रामुख्याने **डॉ. प्रदीप जैन (उपरोल्लेखित)** आणि **विशाल गोयल (उपरोल्लेखित)** या प्रकरणांमधील या न्यायालयाने दिलेल्या निकालांचा मुख्यत्वेकरून आधार घेतला आहे.

७. या परिस्थितीत, आम्ही या प्रकरणात उच्च न्यायालयाने घेतलेल्या मताला दुजोरा देतो आणि त्यामुळे त्या न्यायालयाच्या न्यायनिर्णयामध्ये हस्तक्षेप करण्याचे कोणतेही कारण आम्हास दिसत नाही. त्यामुळे खर्चाबाबत कोणताही आदेश न देता अपील फेटाळण्यात येत आहे.

दिव्या पांडे अपील फेटाळण्यात आले.

---

<u>अस्वीकरण</u>

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या / तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजावून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणीकरिता वैध मानला जाईल.

- x - x - x - x - x - x - x - x - x -